(1410)

HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
AKOLA 444001
Inward No. ..................
Date ..23/06/2004

होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, अकोट रोड, अकोला, या संस्थेची प्रवेशक्षमता ४० वरुन ५० एवढी पुनर्स्थापित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय, क्रमांक-एचएमसी-१००४/३७/सीआर-१६/०४/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ जून, २००४

संदर्भ : १) केंद्रिय होमिओपॅथी परिषदेचे पत्र क्रमांक : १२-३/९८-सीसीएच (पीटी) २७९६९ दिनांक १० ऑक्टोबर, २००१
२) महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठाचे क्र. मआविवि/ईपी-१७/४५०८/८७१३/२००३, दिनांक २९.१२.२००३ चे पत्र.

**शासन निर्णय :-** होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, अकोट रोड, अकोला, या संस्थेच स्थापना सन १९५४ मध्ये झालेली असून, महाविद्यालयाची सुरुवातीपासूनची प्रवेशक्षमता ५ एवढी आहे. सन १९९८-९९ पर्यन्त या संस्थेत ५० एवढे प्रवेश करण्यात येत होते. तथापि केंद्रिय परिषदेने सन १९९८-९९ या वर्षी महाविद्यालयाची प्रवेशक्षमता ५० वरुन ४० एवढ केली. सदरची प्रवेशक्षमता पुन्हा ४० वरुन ५० अशी करण्यास केंद्रिय होमिओपॅथी परिषदे त्यांच्या उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक : (१) येथील दिनांक १० ऑक्टोबर, ०१ च्या पत्राद्वा मान्यता दिली आहे. महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठाने ५० एवढी प्रवेशक्षमता करण्या शिफारस त्यांच्या संदर्भाधीन क्रमांक (२) येथील दिनांक २९.१२.०३ च्या पत्रान्वये केल आहे. या बाबी विचारात घेऊन होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, अकोट रोड, अकोला, संस्थेची प्रवेशक्षमता सन २००४-०५ या वर्षापासून ४० वरुन ५० एवढी पुनर्स्थापित करण्या शासन मान्यता देत आहे.

२. सन २००४-०५ या वर्षी सदर महाविद्यालयाच्या ४० वरुन ५० एवढ्या पुनर्स्थापि प्रवेशक्षमतेस महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्नीकरण प्राप्त झाल्या पुनर्स्थापनाने वाढणाऱ्या १० जागांवर सुद्धा प्रवेश करण्याची कार्यवाही संबंधितांकडून करण्य यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दत्तात्रय बोऱ्हाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
सचिव, केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली.

Dr. S. U. Tiwari
Principal
Homoeopathic Medical College
Akot Road, Akola

Alka GR-24 (71)/comp-1
6/14/04/ 5:02:458 PM

Dr. S. U. Tiwari
Principal
Homoeopathic Medical College
Akot Road, Akola